# ३२५ दिवसांत खोदले मेट्रोसाठीचे भुयार

## भुयारीकरणाचा ४० वा टप्पा महालक्ष्मी येथे पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गावरील महालक्ष्मी मेट्रो स्थानकावर भुयारीकरणाचा ४० वा टप्पा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे यशस्वीरीत्या पार पडला. तानसा-१ या रॉबिन्स बनावटीच्या टनेल बोरिंग मशीनद्वारे सायन्स म्युझियम मेट्रो स्थानक ते महालक्ष्मी मेट्रो स्थानक हा डाऊन - लाइन मार्गाचा ११३५.५ मीटर भुयारीकरणाचा टप्पा एकूण ७५७ रिंग्सच्या साहाय्याने ३२५ दिवसांत पूर्ण करण्यात आला. दरम्यान, मेट्रो-३ प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण ५३ किलोमीटर म्हणजेच ९७ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजीत सिंह देओल यांनी सांगितले की, सायन्स म्युझियम ते महालक्ष्मी स्थानक या टप्प्यातील भुयारीकरण पश्चिम रेल्वे मार्गावरील महालक्ष्मी आणि लोअर परेल रेल्वे स्थानकांच्या दरम्यान रेल्वेमार्गाच्या खालून करण्यात आले आहे. हे बोगदे जेकब सर्कल येथील महानगरपालिकेच्या १७ मीटर खोल भूमिगत गटार पंपिंग स्टेशनच्या जवळ आहेत. त्यामुळे येथे भुयारीकरण करणे जिकिरीचे होते. मेट्रो-३ मार्गिकेतील पॅकेज-३ मध्ये पाच स्थानके असून हा या मार्गिकेतील सर्वात लांब टप्पा आहे. या अंतर्गत मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक आणि वरळी मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. आतापर्यंत या पॅकेज अंतर्गत चार भुयारीकरणाचे टप्पे पूर्ण झाले आहेत.



### भुयारीकरणाचा तपशील

- सायन्स म्युझियम ते वरळी (अप लाइन - २०७२ मीटर, डाऊन लाइन - २०५७ मीटर)
- सायन्स म्युझियम ते महालक्ष्मी (अप लाइन - ११९७.५ मीटर, डाऊन लाइन - ११३५.५ मीटर)